# झाडी-गोडी सप्तपर्णी

**गोष्ट - केतकी घाटे**
**चित्र - ओंकार मरकळे**

चिनू तिच्या आजीबरोबर संध्याकाळी फिरायला गेली होती. फुटपाथवरून चालताना अचानक चिनूला कसला तरी वास आला. 'आजी, कसला वास येतोय? कुठल्यातरी मसाल्याचा वास आहे का हा? ' आजी फुटपाथच्या बाजूला असलेल्या हिरव्यागार झाडाजवळ गेली. त्यावर भरपूर पांढरी फुलं फुलली होती.

झाडावरचा पांढरा फुलोरा खुडून तिने चिनूच्या हातात दिला आणि म्हणाली, 'याचा वास घे बरं'. नाक उडवत चिनूने फुलांचा वास घेतला, 'या फुलातूनच हा वास येतोय !' आजी म्हणाली, 'हे सप्तपर्णीचं झाड आहे. पावसाळा संपला की पांढऱ्या गुबगुबीत फुलांनी सप्तपर्णीची झाडं बहरून जातात. साधारण ५,९, किंवा ७ पानं एकत्र मिळून असा सुंदर आकार तयार होतो म्हणून या झाडाला सप्तपर्णी किंवा सातवीण म्हणतात.'





हा 'सदाहरित' वृक्ष आहे म्हणजे कायम तो हिरवागार असतो. वर्षभर त्याला पानं असतात आणि त्याच्या फांद्या छान सावली देतात. खरंतर हा वृक्ष मूळचा सह्याद्रीतला. भरपूर पावसाच्या प्रदेशातला. पण तो इतका गुणी आहे की लोकांनी जवळ–जवळ भारतभर सप्तपर्णीची झाडं लावली. ह्याचं लाकूड मऊ आहे. त्याच्यापासून काडेपेट्या, दफन पेट्या, पाटी अशा वस्तू बनवतात. सप्तपर्णीची  पानं, मुळं, साल औषधातही वापरतात.



'खरंच छान आणि गुणी आहे गं सप्तपर्णीचं हे झाड, आजी' झाडाच्या खोडावरून हात फिरवत चिनू म्हणाली.



**निसर्गविषयक बुद्धिमत्ता**

आपल्या परिसरातली झाडं आपल्याला माहित असायला हवीत. झाडं निसर्गातला महत्त्वाचा घटक आहेत. आपल्याला झाडांशी जोडणारं हे सदर आहे.